# राष्ट्रीय सेवा योजना

## शैक्षणिक वर्ष- २०१६-१७

## वार्षिक अहवाल

महाविद्यालयीन उच्च शिक्षण घेणा-या विधी पदवी वर्गातील विद्यार्थी/विद्यार्थीनी मध्ये सेवाभावी वृत्ती जोपासली जावी, त्यांच्यात श्रमप्रतिष्ठा वाढीस लागावी, सामाजिक बांधीलकीचा दृष्टीकोन विकसीत व्हावा, राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यासाठी त्यांनी सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारावा, जातीभेद, अस्पृश्यता, अंधश्रध्दा, हंडापध्दत, स्त्री-पुरुष विषमता, जलसंवर्धन व पर्यावरणाचे अधःपतन अशा देशासमोरील गुंतागुंतीच्या अनिष्ठ रुढी परंपराबध्दल प्रबोधीत होऊन समाजातून या सर्वांचे उच्चाटण करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी सातत्याने प्रयत्नशिल असतो.

## वार्षीक अहवाल

१ ऑगस्ट २०१६ रोजी महाविद्यालयातील ५० विद्यार्थ्यांचा रा.स.यो. साठी प्रवेश निश्चित करुन त्यांची प्राचार्या डॉ. ॲनी जॉन यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन विद्यार्थ्यांचे रा.स.यो. संदर्भात प्रबोधन करण्यात आले.

२ गुणनुक्रमे व मुलाखतीद्वारे रासयो चे प्रतिनिधी म्हणून कृष्णा कांबळे यांची शै.वर्ष २०१६-१७ साठी निवड करण्यात आली.

३ रा.से.यो शिबीर काळात अनेकविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये पुढील कार्यक्रमाचा समावेश आहे.

## १) दि. ०२/०७/२०१६ वनमोहत्सव

संत तुकाराम महाराजांनी पर्यावरण व वृक्षसंवर्धनाचे महत्व जाणले होते आणि त्यासाठी त्यांनी आपल्या अभंगरचनेद्वारा समाजप्रबोधनही घडवले होते.

**“वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे!**

**पक्षीही सुस्वरे आळविती!”**

पर्यावरणावरच मानवी व मानवेत्तर प्राण्यांचे जीवन अवलंबून आहे. पर्यावरण सुस्थितीत राहिले तरच सजीवांचे अस्तित्व पृथ्वीवर राहणार आहे. हाच दृष्टीकोन ठेवून नव्या पिढीला वृक्षसंवर्धनाचा संस्कार मिळावा म्हणून दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, श्री लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष श्री आरविंदजी सोनवणे, सचिव श्री रमेशजी बियाणी, सर्व पदाधिकारी तसेच दयानंद विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, महाविद्यालयातीच्या प्राचार्या डॉ. ॲनी जॉन, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण केले. विद्यार्थी नियमितपणे या वृक्षांना पाणी घालून ते जगवण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

## २ दि- ०८.०९.२०१६ शिक्षक दिन

दि.०८ सप्टेंबर २०१६ विधी महाविद्यालयातध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला. नवनिर्वाचित विद्यार्थी संसद मंडळ, रा.से.यो. व महाविद्यालयाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. प्रा.विक्रम हिप्परकर हे लाभले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. ॲनी जॉन या होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करित असताना प्राचार्यांनी विद्यार्थी व शिक्षक यांच्यात अतूट नाते निर्माण करणे गरजेचे आहे. त्यासाठी विश्वास हा महत्वाचा आहे

आणि आपली आई हिच ख-या अर्थाने गुरु आहे असे आपले मत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांनी शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांची नैतिक व गुणात्मक विकास करण्याचे साधन आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी माणूस बनण्याचा प्रयत्न करावा. आजची तरुण पिढी ही उद्याचे आपल्या देशाचे भवितव्य आहे असे आपले मत व्यक्त केले.

या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.जि.के.पिल्लई, विद्यार्थी सचिव व सदस्य तसेच इतर शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## ०३) दि. २५.०१.२०१७ रक्तदान शिबीर

दयानंद विधी महाविद्यालयामध्ये दि. २५.०१.२०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व भालचंद्र ब्लड बँक लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदरील रक्तदान शिबीरास विद्यार्थ्यांचा उत्स्फुत प्रतिसाद मिळाला आहे. एकूण सदोतीस विद्यार्थ्यांनी रक्तदान करुन समाजाप्रती असलेली कणव दाखवली आहे.

सदरील रक्तदान शिबीरास यशस्वी करण्यासाठी उप-प्राचार्य डॉ. जी.के.पिल्लई, राष्ट्रीस सेवा योजनेचे समन्वयक प्रा. जाधव एन डी आणि महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## ४) दि. २७.०२.२०१७ “मराठी भाषा गौरव दिन विषयी जनजागृती”

दयानंद विधी महाविद्यालयात दिनांक २७ फेब्रुवारी २०१७ रोजी मराठी गौरव दिना विषयी जनजागृती करण्यासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ॲड विशाल दिक्षीत यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेतील बारकावे याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. तसेच मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दैनंदिन कामकाजामध्ये मराठी भाषेचा वापर

करण्याविषयी सुचिविले. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.ॲनी जॉन, उपप्राचार्य डॉ.जी.के.पिल्लाई, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ग्रंथपाल सौ. महाजन एस.ए. यांनी केले.

## ५) दि. ०४.०३.२०१७ " आपत्ती व्यवस्थापन"

दयानंद विधी महाविद्यालयामध्ये दि. ०४.०३.२०१७ रोजी लातूर जिल्हाआपत्ती व्यवस्थापन जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्यामार्फत (एन.डी.आर.एफ.) चा चमू सर्वसाहित्यासहित आपल्या महाविद्यालयामध्ये अवेळी येणा-या आपत्तीला कशा पध्दतीने सामोरे जावे आणि त्या आपत्तीत कोणकोणत्या टाकाऊ वस्तुपासून आपल्याला कसा उपयोग होतो, आपत्ती काळातील सर्व साहित्य आणि ते कशा पध्दतीने हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. ॲनी जॉन उपप्राचार्य डॉ.जी.के.पिल्लाई, महाविद्यालयाचे प्रसिध्दी प्रमुख प्रा. शिंदे पि.जी. , राष्ट्रीस सेवा योजनेचे समन्वया एन.डी.जाधव शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठया उत्साहाने विद्यार्थी उपस्थित होते.

## ६) दि. ०५.०३.२०१७ "विशेष शिबीर"

मौजे नागझरी ता. लातूर येथे दयानंद विधी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवशीय युवक निवासी शिबीराचे उद्‌घाटन समारंभ दिनांक ०५.०३.२०१७ रोजी झाले. शिबीराच्या दुस-या दिवशी भालचंद्र ब्लड बँक लातूर यांच्या सहकार्याने रक्तगट व हिमोग्लोबीन चाचणी घेण्यात आली. त्याच दिवशी सायंकाळच्या सत्रात दयानंद विधी महाविद्यालयाच्या सांस्कृतीक विभागातर्फे लोककला सादर केली. शिबीराच्या तिस-या दिवशी सकाळच्या सत्रात कामगार कायदे या विषयावर श्री. एन एन ईटकरी माजी कामगार

आयुक्त यांचे व्याख्यान झाले. सायंकाळच्य सत्रात लोकशाहीर धम्मपाल सावंत यांचे समाजप्रबोधन व स्वच्छतेच्या विषयावर लोकगितांचा कार्यक्रम पार पडला.

शिबीराच्या चौथ्या दिवशी सकाळच्या सत्रात ईच्छाशक्ती ही यशस्वी जिवनाची गुरुकिल्ली डॉ. एस एस हांडेबाग यांचे व्याख्यान झाले. सायंकाळच्या सत्रात श्री राहूल भालेराव यांच्या बोलक्या बाहूल्या आणि नकला या माध्यमातून समाजप्रबोधनाचा कार्यक्रम घेण्यात आला. शिबीराच्या पाचव्या दिवशी महिला सबलीकरण आणि ग्रामविकास या विषयावर मुख्याध्यापिका सुनिता देशमूख यांचे व्याख्यान व एकपात्री नाटक सादर झाले. सायंकाळच्या सत्रात स्वधार अंधअपंग पूर्नवसन केंद्र बुधोडा येथील कलावंतानी समाजप्रबोधनपत्र गिते सादर केली. शिबीराच्या सहाव्या दिवशी सकाळच्या सत्रात प्रा. एस व्हि डोंगरे यांनी राष्ट्रीस सेवा योजनेतील करिअरच्या संधी या विषयावर व्याख्यान दिले. सायंकाळच्या सत्रात समाजप्रबोधन व गावस्वच्छता या विषयावर प्रा. श्री मारुती माळी महाराज यांच्या किर्तनाचा कार्यक्रम झाला.

शिबीराच्या शेवटच्या दिवशी प्रा. संग्राम मोरे सिनेट सदस्य स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये समारोप करण्यात आला. सदरील कार्यक्रमास राष्ट्रीस सेवा योजनेचे कार्यक्रम आधिकारी प्रा. एन डी जाधव सर, प्राध्यापीका स्वाती पाटील मॅडम, सरपंच श्री श्रीराम साळुंके, उपसरपंच श्री परमेश्वर पवार व समस्त गावकरी उपस्थित होते. निरोपसमारंभाचे सुत्रसंचालन शिबीरार्थी काबंळे कृष्णा तर आभार प्रदर्शन प्राध्यापिका स्वाती पाटील मॅडम यांनी केले.

कार्यक्रमाधिकारी                                                                 प्राचार्य

राष्ट्रीय सेवा योजना